# प्रेसनोट दि.२९/१२/२०१७

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

## "सराईत गुन्हेगाराकडुन ८४ किलो गांजा जप्त"

दि. २९/१२/२०१७ रोजी आम्ही स्वतः व अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील स्टाफ सरकारी वाहनाने सिंहगड पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाचे अनुषंगाने बेकायदेशीर व्यापार करणा-या इसमांबाबत माहिती काढणे कामी पेट्रोलिंग फिरत असतांना ०२.३० वा. चे सुमारास पुणे येथील सिंहगड रोड रस्त्यावरील, रांका ज्वेलर्सचे बाजुस, राजाराम पुलाकडे जाणा-या दिशेस, विठ्ठल सायकल मार्ट दुकाना समोर रोडवर, सार्वजनिक ठिकाणी सराईत गुन्हेगार नामे महेश गोरख साळुंके हा संशयितरित्या हुडाई ॲसेन्ट कार क्र. एम एच १२ बी व्ही ४६३४ सह थाबंलेला आढळुन आला.

त्यांचेकडे अंमली पदार्थ असल्याचा संशय आल्याने, एनडीपीएस कायदयातील तरतुदी प्रमाणे वरील त्याचेकडील कारची झडती घेतली असता, कारचे डिक्कीत ४ बारदान पोत्यात एकुण ८४ किलो गांजा, एकुण कि.रु. १३,९५,०००/- चा मिळुन आला. नमुद गुन्हेगाराविरुद्ध यापुर्वी गांजा बाळगल्याबाबत दोन गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याचे विरुद्ध शरीराविरुद्धचे गुन्हेही दाखल आहेत.

सदरची कारवाई मा. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे व मा. मिलींद पाटील सहा. पोलीस आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व पोलीस कर्मचारी दिलीप जोशी, ज्ञानदेव घनवट, शिवाजी राहिगुडे, मोहन साळवी, गणेश देशपांडे, सुशिल काकड़े, सौ. अरुणा राजगुरु, प्रफुल साबळे, मनोज साळुंके, रोहन चवरकर, विठ्ठल खिलारे, मीना पिंजण, सचिन चंदन, अमित छडीदार, स्नेहल जाधव, सागर बोरगे, यांनी केली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास व्ही. बी. जगताप सहा. पोलीस निरीक्षक, सिंहगड रोड, पो. स्टे. पुणे शहर हे करत आहेत.